N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** अकोला **P.S. (पोलीस ठाणे):** सिटी कोतवाली **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0238 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/06/2026 01:43 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 25/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 25/06/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 16:43 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:58 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 26/06/2026 **Time (वेळ):** 01:12 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 26/06/2026 01:12 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सहजिल्हा निबंधक तथा, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय,अकाोला

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): मिलींदकुमार बहाकर

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1979

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, अकोला, सिटी कोतवाली, अकोला, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, अकोला, सिटी कोतवाली, अकोला, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9158822676

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. किरण पुरूशोत्तम चाõधरी | | | 1. हमु अभिलाषा अपार्टमेंट,Town/Village (शहर / गाव): आकाशवाणीच्या मागे,अकोला,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सिव्हील लाईन,District (जिल्हा): अकोला,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपय च या20 ना ेटा एकुण 10,000/ | 10,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 10,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

यावेळी मा.पाõ.नि.संजय गवइ सा.यांचे आदेशाने नाइटऑफीसर HC प्रकाश मांडवगणे ब नं 150 यांनी अप नं 238/2026 कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल केला फिर्याद लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला दिनांक:- 25.06.2026 मी मिलींदकुमार बहाकर,

वय 47 वर्ष, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला शासनातर्फे फिर्याद देतो की, दिनांक 24.06.2026 रोजी तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया, वय 40 वर्ष, शिक्षण- बी. का◌ॅम, धंदा- व्यापार, रा. आकाशवाणीच्या मागे शास्त्रीनगर जि. अकोला हे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांना त्यांचे तक्रारी बाबत प्रथम सविस्तर विचारपूस केली. त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तोंडी तक्रार नोंदवून घेण्याची विनंती केली.दिनांक 24.06.2026 रोजी श्री. प्रविण वेरूळकर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला यांनी एका गोपनिय कार्यवाही करीता मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 944/2026 अन्वये पत्र देवून त्यांचे कार्यालयातील श्री. विलास प्रितम षिंदे, कनिश्ठ लिपीक व श्री. विनायक तुकाराम सोळंखे, पॅम्प मेकॅनिक यांना ला.प्र.वि. अकोला कार्यालयात बोलाविण्यात आले होते. नमुद दोन्ही पंच यावेळी कार्यालयात हजर होते.आम्ही कार्यालयात हजर असलेल्या दोन्ही शासकीय पंचांना सांगितले की, आमच्याकडे एका तक्रारदाराची एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधी तक्रार असुन त्या तक्रारीनुसार लाच मागणी संबंधाने योग्य पडताळणी झाल्यास त्यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजित करून पुढील कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे. या लाचेच्या सापळा कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याची त्यांची संमती विचारली असता त्यांनी पंच म्हणुन काम करण्याची लेखी संमती दिली.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत त्यांना तोंडी विचारपूस करण्यास सांगीतले. त्यावरून दोन्ही पंचांनी तक्रारदारास विचारणा केली. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांची तोंडी तक्रार कार्यालयीन लॅपटा◌ॅपवर टंकलिखित करण्यात आली. सदर टंकलिखीत तक्रारीची प्रिंट आऊट काढून त्या तक्रारीवर तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांचेकडे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केलेला मजकुर सारखाच असल्याची आमची व दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे. " मी आज दिनांक 24.06.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर येवुन तक्रार देतो की, मी वर नमुद पत्त्यावर राहत असून व्यापारी आहे. माझे वडील नामे श्री. रामकुमार लोहीया यांचे श्री. विक्रम राजकुमार झुनझुनवाला, रा. कोठारी लेआऊट, श्रीकृष्ण वाटीका, अकोला ता. जि. अकोला यांचेषी व्यापाराचे कामाकाजासंबंधाने व्यावहारीक संबंध असुन ते व्यापारामध्ये पार्टनर आहेत. माझे वडील व विक्रम झुनझुनवाला या दोघांनी एमआयडीसी अकोला जि. अकोला येथे प्ला ◌ॅट क्र. एन/257 ही जागा 2023 मध्ये भाडेतत्वावर घेतली होती. सदरची जागा ही 1485 स्वे.मी. असुन त्यापैकी 630 स्वे.मी. जागेवर बांधकाम असुन 855 स्वे.मी. जागा ही मोकळी आहे. सन 2024 मध्ये माझे वडील मरण पावल्यानंतर नमुद जागा ही माझे व विक्रम झुनझुनवाला याचे नावावर असलेल्या मॆं सतराणी एग्रो इंन्डस्ट्रीज नावे झाली आहे. श्री. विक्रम राजकुमार झुनझुनवाला यांनी मला म्हटले◌े की, आपण सदरची जागा ही विक्री करू किंवा तुम्हाला पाहिजे असल्यास तुम्ही ठेवून घ्या. त्यामुळे सदरची जागा मला भविश्यात श्री. सालासर एग्रो शा◌ॅटेक्स या नविन नावाने करण्याचे मी ठरवीले. त्यामुळे नमुद जागेवर आजपावेतो भाडेपट्टा करीता लागणारा थकबाकी मुंद्राक शुल्क

भरणे आवष्यक असल्याने माझे पार्टनर श्री. विक्रम झुनझुनवाला यांनी नौंदणी व मुद्रांक विभाग, अकोला येथे भाडेपट्टा करीता लागणारे मुद्रांक शुल्क काढुन देण्याकरीता अर्ज सादर केला आहे. कारण विक्रम झुनझुनवाला आमच्या 2023 च्या नौंदणी मध्ये त्यांचे नांव क्रमांक 1 वर आहे.त्याअनुशंगाने दि. 23/06/026 रोजी मी नौंदणी व मुद्रांक विभाग अकोला येथे जावुन विक्रम झुनझुनवाला यांनी दिलेल्या अर्जाबाबत श्री. किरण चाॆधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांना विचारपूस केली. तेव्हा त्यांनी मला त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र. 10-3/जा. क्र ./चु.मु.शु.प्र..क्र-58.2026-2027/मागणीपत्र/1128/2026 दि. 23/06/2026 अन्वये दस्त योग्य मुद्रांकीत करून मिळण्याबाबत पत्र दिले. त्यामध्ये एकुण रू. 1,94,000/- मुद्रांक शुल्क तसेच दंड म्हणुन रू. 73,270/- असे एकुण रू. 2,67,270/- चलान भरण्याबाबतचे आर्डर (पत्र) मला दिले. ही रक्कम मला जास्त वाटली म्हणुन मी किरण चाॆधरी साहेबांना रक्कम जास्त का लावली याबाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी मला आता मी जेवन करायला जातो, तु 4 वाजता येत असे म्हटले. त्यावेळी मी ते पत्र सोबत घेवून गेलो व त्याची एक झेराक्स काढली. त्यानंतर मी 4 वाजता नंतर श्री. किरण चाॆधरी साहेबाच्या कार्यालयात गेलो व तिथे त्यांची भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना म्हटले की, रू. 2,67,000/- ही रक्कम जास्त आहे. त्यावर त्यांनी मला म्हटले की, तु मला 2,67,000/- रूपयाची आॅर्डर परत दे, व माझ्याकडून ती आर्डर परत घेवून तयंनी स्वतःकडे ठेवली. व मला म्हटले की, मी तुझी चालानची रक्कम कमी करून देतो, ती मी 1 लाख रूपयाचे आत आर्डर करून देतो, व दस्त क्र. 3091 लवकरात लवकर प्रमाणित करून देतो, त्याकरीता मला 10,000/- रूपये द्यावे लागतील असे म्हटले. त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव ठिक आहे असे म्हटले. त्यानंतर त्यांनी मला एकुण रू. 97,310/- ची चलान भरण्याबाबतचे त्याच तारखेचे व त्याच जावक क्रमांकाचे दुसरे आर्डर (पत्र) दिले. व चलान भरणा करून मला दुस-याच दिवशी 10,000/- घेवून बोलाविले. त्यानुसार मी सदर पत्र घेवून तिथून निघून आलो. ही आर्डर घेवून मला आॅनलाईन चलान भरणे आवश्क होते. म्हणुन मी दिनांक 24.06.2026 रोजी चलानची रक्कम रू. 97,310/- आॅनलाईन भरणा केली. गैरअर्जदार श्री. किरण चाॆधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांनी मला भाडेपट्टा करीता लागणारे मुद्रांक शुल्क व दंडाची रक्कम कमी करून दिल्याबद्दल व नमुद प्रकरणाची फाईल (दस्त) लवकरात लवकर प्रमाणित करून देण्याकरीता माझ्याकडे रू. 10,000/- लाचेची मागणी केली. ती त्यांना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. माझी त्यांचेषी कोणत्याही प्रकारची देवाण-घेवाण अथवा वैमनस्य नाही.माझी तक्रार माझे सांगीतल्याप्रमाणे लॅपटाॅपवर टंकलिखीत केलेली असून ती मी वाचून पाहिली असता माझे सांगीतल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे." तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांनी नौंदविलेल्या तक्रारी नुसार गैरअर्जदार श्री. किरण चाॆधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाॅईस रेकार्डरव्दारे लाच मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर दिनांक 24.06.2026 चे 17.11 वा. ते 17.31 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. किरण चाॆधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांची तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी जिल्हा मुद्रांक अधिकारी कार्यालय, अकोला ता.जि. अकोला येथील कार्यालयीन कक्षात करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही मध्ये गैरअर्जदार श्री. किरण चा

ौधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांनी तक्रारदारास भाडेपट्टा करीता लागणारे मुद्रांक शुल्क व दंडाची रक्कम कमी करून दिल्याबद्दल तसेच नमुद प्रकरणातील फाईल/दस्त प्रमाणित करून देण्याकरीता तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांचेकडे स्वतःच्या आर्थीक फायद्याकरीता रू. 10,000/- लाच रकमेची मागणी केली. तसेच त्यांचे कार्यालयातील श्री. प्रविण डांगरे, लिपीक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांना दोन तिन हजार रूपये देवून द्या असे बोलून लाच रकमेच्या व्यवहारास प्रोत्साहन दिले. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. किरण चाौधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांनी त्यांचे कार्यालयातील श्री. प्रविण डांगरे, लिपीक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांना दोन तिन हजार रूपये देवून द्या असे म्हटल्याने श्री. प्रविण डांगरे, लिपीक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाॅईस रेकार्डरव्दारे लाच मागणीची पडताळणी दिनांक 25.06.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 24.06.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनांक 25.06.2026 चे 15.26 वा. ते 15.45 वा. दरम्यान श्री. प्रविण डांगरे, लिपीक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांची लाच मागणीची पडताळणी जिल्हा मुद्रांक अधिकारी कार्यालय, अकोला ता.जि. अकोला येथे करण्यात आली सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही मध्ये श्री. प्रविण डांगरे, लिपीक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांनी तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांचेकडे कुठल्याही प्रकारची लाच रकमेची मागणी केली नाही. त्यामुळे गैरअर्जदार श्री. किरण चाौधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांचे विरूध्द पुढील सापळा रचण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर दिनांक 25.11.2026 चे 16.43 वा. ते 16.58 वा. दरम्यान गैरअर्जदार श्री. किरण चा ौधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांचे विरूध्द मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. किरण चाौधरी, मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला यांनी तक्रारदार श्री. अश्विन रामकुमार लोहीया यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 10,000/- तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारली. त्यानंतर गैरअर्जदार श्री. किरण चाौधरी यांचेकडून लाच रक्कम रू. 10,000/- दोन्ही पंचासमक्ष जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आली. दिनांक 25.06.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत. करीता आरोपी श्री. किरण पुरूशोत्तम चाौधरी, वय 57 वर्श, पद- सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अकोला वर्ग-1 रा. गणेष काॅलनी, खाजामीया रोड, जळगांव ता.जि. जळगांव, ह.मु. अभिलाषा अपार्टमेंट, आकाशवाणीच्या मागे, अकोला ता.जि. अकोला यांचे हे कृत्य कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा होत असल्याने माझी त्यांचे विरूध्द शासनातर्फे कायदेषीर फिर्याद आहे.

**Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**

**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SANJAY NATTHU GAWAI (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Digitally Signed by: PRAKASH PUNDALIK MANDAGAWANE
Rank: HC (Head Constable)
Unique No: 92239373008001662
On: 6/26/2026 1:52:23 AM
At PS: CITY KOTWALI, AKOLA

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANJAY NATTHU GAWAI

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1969 | | | | चेचक: होय |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)